सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३.

(महाराष्ट्र)

# मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८

(दिनांक १२ जुलै, २००६ पर्यंत सुधारित)

## BOMBAY ACT No. XXXIII OF 1948

(Maharashtra)

# The Bombay Land Requisition Act, 1948

*(As modified upto the 12th July 2006)*

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४, यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

[ **किंमत :** रुपये ९.०० ]

# मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे


| कलम | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव. | २ |
| २. | व्याप्ती. | २ |
| ३. | [वगळण्यात आले]. | २ |
| ४. | व्याख्या. | ३ |
| ५. | जमिनीचे अधिग्रहण. | ३ |
| ६. | रिकाम्या जागांचे अधिग्रहण. | ४ |
| ७. | अधिग्रहण चालू ठेवणे. | ५ |
| ७-क. | भारत संरक्षण अधिनियम, १९६२ अन्वये करण्यात आलेले अधिग्रहण चालू राहणे. | ६ |
| ८. | नुकसानभरपाई देणे. | ६ |
| ८-क-१. | अभिलेख मागवण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | ७ |
| ८-क. | आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याचे जमीन मालकाचे कर्तव्य. | ७ |
| ८-क-क. | अधिग्रहण केलेल्या जागांना सन १८८८ चा मुंबई अधिनियम ३ चे कलम ४९९ लागू करणे. | ८ |
| ८-ख. | सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक. | ८ |
| ८-ग. | काढून टाकण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार. | ८ |
| ८-घ. | सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशाविरुद्ध अपिले. | ९ |
| ७-ङ. | अधिग्रहण केलेली जमीन वाट्यास देणे हे लायसन्स असल्याप्रमाणे मानणे आणि येणे रकमा जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीयोग्य असणे. | १० |
| ८-च. | अधिकारितेस रोध. | १० |
| ९. | अधिग्रहणातून मुक्तता. | १० |
| ९-क. | अधिग्रहण केलेल्या किंवा अधिग्रहण करावयाच्या जमिनीच्या किंवा जागेच्या मालकाला नुकसानभरपाईकरिता अर्ज सादर करण्याविषयी नोटीस देण्याबाबत. | ११ |
| ९-ख. | नुकसानभरपाईकरिता करावयाचा अर्ज कोणत्या अधिकाऱ्याकडे, कशा रीतीने आणि किती मुदतीच्या आत करावयाचा. | १२ |
| ९-ग. | नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यासाठी करावयाचा अर्ज वेळेवर न केल्यास नुकसान-भरपाईची रक्कम एकतर्फी ठरविणे. | १२ |
| १०. | चौकशीचे अधिकार. | १२ |
| ११. | कब्जा घेण्याचा अधिकार. | १३ |

## अनुक्रमणिका—चालू


| कलमे. | | पृष्ठे |
|---|---|---|
| १२. | माहिती मिळवण्याचा अधिकार. | १३ |
| १३. | आदेश प्रसिद्ध करणे व ते बजावणे. | १३ |
| १४. | जमिनीवर प्रवेश करण्याचा व तिची तपासणी करण्याचा अधिकार. | १४ |
| १५. | कामांचे प्रत्यायोजन. | १४ |
| १६. | सूट. | १४ |
| १७. | या अधिनियमाखाली केलेल्या कार्यवाहीस संरक्षण. | १४ |
| १८. | अधिकारी लोकसेवक असल्याचे समजणे. | १५ |
| १९. | नियम करण्याचा अधिकार. | १५ |
| २०. | निरसन. | १५ |
| २०-क. | सन १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक ६३ याचे निरसन व व्यावृत्ती. | १५ |
| २०-ख. | मालमत्तेचे संपादन व अधिग्रहण करण्याबाबतचे इतर कायदे चालू असणे. | १६ |
| २१. | अधिग्रहण आदेशांचे विधिग्राह्यीकरण. | १६ |
| २२. | घोषित करण्यात आले नाही या कारणास्तव विवक्षित आदेश विधिअग्राह्य न ठरणे. | १६ |
| २३. | व्यावृत्ती. | १७ |
| | अनुसूची. | १७ |

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३[१]

## मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८*

[या अधिनियमाला गव्हर्नर जनरल यांची दिनांक ११ एप्रिल, १९४८ रोजी अनुमती मिळाली. ही अनुमती मुंबई राजपत्र, भाग चार मध्ये दिनांक ११ एप्रिल, १९४८ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आली.]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम यांद्वारे रूपभेद, अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २

विधि अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९†
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०.
सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.
सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९१.
सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.
सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.
सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

---

[१] उद्दिष्टे व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९४८, भाग ५, पृष्ठ २१६ पहा.

* हा अधिनियम मुंबई राज्याच्या उर्वरित क्षेत्रांना लागू करण्यात आला व अशा रीतीने तो लागू करण्यात आल्यामुळे तो तेथे अंमलात राहील. (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३ याचे कलम २ पहा).

† सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९ याचे कलम ६ खालीलप्रमाणे आहे :—

"**६. सुधारणांचा भूतलक्षी प्रभाव असणे** :—या अधिनियमान्वये केलेल्या सुधारणा ह्या, २६ जानेवारी, १९५० पासून करण्यात आल्या आहेत व तशा त्या नेहमीच करण्यात आल्या होत्या असे समजले पाहिजे आणि त्या तारखेला किंवा त्या तारखेनंतर उक्त अधिनियमाच्या कलमे ५, ६ आणि ७ यांअन्वये देण्यात आलेले सर्व अधिग्रहण आदेश हे, प्रस्तुत अधिनियमान्वये सुधारणा केलेल्या उक्त अधिनियमान्वये काढण्यात आले आहेत असे समजण्यात येईल आणि अशा कोणत्याही आदेशांच्या बाबतीत, तो आदेश ज्या पूर्वोक्त तरतुदींअन्वये काढण्यात आला त्या तरतुदींमध्ये, प्रस्तुत अधिनियमान्वये करण्यात आलेल्या सुधारणा अशा आदेशाच्या तारखेला अंतर्भूत केलेल्या नव्हत्या एवढ्याच केवळ कारणावरून अशा आदेशावर कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही."

सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.
सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.
सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०.
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ (२७-१२-१९७३)§
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५.
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५
सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५० ‡(१७-११-१९८३)§
सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (२६-१२-१९८८)§
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ (२३-१०-१९९०)§
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ @ (२४-१२-१९९२)§
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० (१०-५-१९९३)§
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ @@(१२-१२-१९९४)§
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ @@@(७-१२-१९९६)§
सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ ††(२६-१२-१९९७)§

## जमिनीचे अधिग्रहण करणे, अधिग्रहण चालू ठेवणे आणि इतर विवक्षित प्रयोजने यांसाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम

[१] **ज्याअर्थी,** जमिनीचे अधिग्रहण करणे, अधिग्रहण चालू ठेवणे आणि इतर विवक्षित प्रयोजने यांसाठी तरतूद करणे इष्ट आहे.

**त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम, १९४८, असे म्हणावे.

---

§ हे चिन्ह अधिनियमांच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

‡ सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, याच्या कलम ३(१) द्वारे सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २१ निरसित करण्यात आला त्याचे पोट-कलम (२) खालीलप्रमाणे आहे :—

"(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे मुख्य अधिनियमान्वये केलेली गोष्ट, किंवा, यथास्थिति, कारवाई असल्याचे समजण्यात येईल."

@ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३(१) द्वारे सन १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ निरसित केला.

@@ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ३(१) द्वारे सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० निरसित केला.

@@@ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ८(१) द्वारे सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३ निरसित केला.

††सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ७(त) द्वारे सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० निरसित केला.

[१] पहिला परिच्छेद व दुसऱ्या परिच्छेदातील " आणि " हा शब्द सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३ याचे कलम ३ अन्वये वगळण्यात आला.

२. (१) हा अधिनियम, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांना लागू होईल आणि असे कोणतेही क्षेत्र अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या वर्णनाप्रमाणे राहिले नाही तरी, तो अशा क्षेत्रांना तसाच पुढे लागू होईल : व्याप्ती.

(२) [१][राज्य] शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा सर्व तरतुदी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकाला इतर कोणत्याही क्षेत्राला लागू करता येतील.

[२][परंतु, मुंबई जमीन अधिग्रहण (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५९ याचा प्रारंभ झाल्यावर प्रस्तुत अधिनियमाच्या सर्व तरतुदी [३] [मुंबई राज्याच्या] उर्वरित क्षेत्रालाही लागू होतील]. १९५९ चा मुंबई ३३.

(३) [१][राज्य] शासन कोणत्याही वेळी, तशाच अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा सर्व तरतुदी, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकाला कोणत्याही क्षेत्राला लागू असल्याचे बंद होईल ; आणि त्या दिनांकाला उक्त तरतुदी अशा क्षेत्रात अंमलात असण्याचे बंद होईल.

**३.** [मुदत]. हे कलम, सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याचे कलम २ अन्वये वगळण्यात आले.

**४.** विषयात किंवा संदर्भात याविरूद्ध काही नसल्यास, या अधिनियमात— व्याख्या.

[४][(१क) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ८-ख खाली सक्षम प्राधिकारी म्हणून नेमलेला अधिकारी, असा आहे ;]

(१) " जमीन " या संज्ञेत जमिनीपासून उत्पन्न होणारे लाभ, आणि इमारती व भूमीशी संलग्न असलेल्या सर्व वस्तू किंवा इमारतींना अथवा भूमीशी संलग्न असलेल्या वस्तूंना कायमच्या जखडलेल्या वस्तू यांचा समावेश होतो.

(२) " जमीनमालक " या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही जागेच्या संबंधात जी व्यक्ती स्वत:साठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसाठी किंवा तिच्या वतीने किंवा तिच्या लाभासाठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीचा विश्वस्त, पालक किंवा प्रापक म्हणून त्या त्या वेळी भाडे घेत असेल किंवा जिला भाडे घेण्याचा हक्क असेल किंवा ती जागा भाड्याने दिली असता अशा रीतीने जी भाडे घेईल किंवा जिला भाडे घेण्याचा हक्क असेल अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ; आणि त्या संज्ञेत भाडेकरू नसलेल्या ज्या व्यक्तीला जमीनमालकाच्या विद्यमाने वेळोवेळी हक्क प्राप्त होतो अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश असेल ; आणखी शिवाय, जर भाडेकरूने कोणतीही जमीन पोट-भाड्याने दिली असेल तर, त्याच्या पोट-भाडेकरूच्या संबंधात भाडेकरूचा या संज्ञेत समावेश होतो.

---

[१] " प्रांत " या शब्दाऐवजी हा शब्द विधी अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये दाखल करण्यात आला.

[२] हे परंतुक सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३ याचे कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[३] " मुंबई राज्याच्या " या शब्दात रुपभेद केला जाणार नाही [महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.].

[४] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम २ द्वारे खंड (१क) समाविष्ट केले.

(३) " जागा " या संज्ञेचा अर्थ, स्वतंत्रपणे भाड्याने दिलेली किंवा देण्याचा इरादा आहे अशी कोणतीही इमारत किंवा इमारतीचा कोणताही भाग, असा आहे व त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(एक) अशा इमारतीला किंवा इमरतीच्या भागाला अंगभूत असलेला बगीचा, पटांगण, मोटारघर व उपगृह असल्यास ते ;

(दोन) त्या इमारतीचा अधिक लाभदायक उपयोग व्हावा म्हणून तिला किंवा तिच्या भागाला जोडलेली कोणतीही जोडकामे ;

मात्र, त्यामध्ये हॉटेलातील किंवा निवासातील खोलीचा किंवा इतर निवासव्यवस्थेचा समावेश होत नाही ;

(४) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले, असा आहे ;

(५) " अधिग्रहण करणे " याचा कोणत्याही जमिनीच्या संबंधातील अर्थ, जमिनीचा कब्जा घेणे किंवा [१][राज्य] शासनाच्या स्वाधीन करण्यास भाग पाडणे, असा आहे.

जमिनीचे अधिग्रहण.

५. (१) [१][राज्य] शासनाच्या मते तसे करणे आवश्यक किंवा इष्ट असेल तर, [१][राज्य] शासनाला, लेखी आदेशाद्वारे कोणत्याही जमिनीचे [२][कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी] अधिग्रहण करता येईल :

परंतु, ज्या इमारतीत किंवा इमारतीच्या ज्या भागात, यथास्थिति, मालक, जमीनमालक किंवा भाडेकरू अशा आदेशाच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या सतत सहा महिन्यांच्या कालावधीत प्रत्यक्ष राहिला असेल अशा इमारतीचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे या कलमान्वये अधिग्रहण करता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही इमारतीचे किंवा तिच्या भागाचे अधिग्रहण करावयाचे असेल तेव्हा १[राज्य] शासन त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करील आणि अधिग्रहणाच्या आदेशात, यथास्थिति, मालक, जमीनमालक किंवा भाडेकरू हा, आदेशाच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या सतत सहा महिन्यांच्या कालावधीत तेथे प्रत्यक्षात राहिला नव्हता असे अधिकथन करील आणि असे अधिकथन हे, तो मालक, जमीनमालक किंवा भाडेकरू त्याप्रमाणे राहिला नव्हता याचा निर्णायक साक्षी पुरावा असेल.

रिकाम्या जागांचे अधिग्रहण.

६. (१) [१][राज्य] शासनाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रातील कोणतीही जागा अशा अधिसूचनेच्या दिनांकाला रिकामी असेल आणि कोणतीही जागा, यथास्थिति जमीन मालकाने, भाडेकरूने किंवा पोट-भाडेकरूने त्या जागेचा भोगवटा करण्याचे बंद केल्यामुळे किंवा अशी जागा अधिग्रहणातून मुक्त करण्यात आल्यामुळे किंवा ती जागा नव्याने उभारण्यात किंवा पुन्हा बांधण्यात येत असल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे रिकामी झाली असेल तेव्हा, अशा जागेच्या जमीनमालकाने त्यासंबंधीची खबर विहित नमुन्यात [१][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला दिली पाहिजे.

---

[१] " प्रांत " या शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये दाखल करण्यात आला.

[२] " राज्याच्या प्रयोजनासाठी किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी " या शब्दाऐवजी हे शब्द, मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय)आदेश, १९५६ अन्वये दाखल करण्यात आले.

(२) यासंबंधीची खबर, उक्त अधिसूचनेच्या दिनांकाला रिकाम्या असलेल्या जागांच्या बाबतीत अशा दिनांकापासून एक महिन्याच्या आत आणि इतर बाबतीत जागा ज्या दिनांकाला रिकामी होईल किंवा भोगवटा करण्यासाठी उपलब्ध होईल त्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत [१][नोंदणीकृत डाकेने] पाठवली पाहिजे.

(३) जमीनमालकाने [२][राज्य] शासनाच्या परवानगीशिवाय, खबर देण्यापूर्वी आणि ज्या दिनांकाला खबर मिळाली असेल त्या दिनांकापासून एक महिन्याच्या मुदतीपर्यंत अशी जागा भाड्याने देता कामा नये किंवा तिचा भोगवटा करता किंवा करू देता कामा नये.

(४) पोट-कलम (१) अन्वये खबर दिलेली असो किंवा नसो, आणि कलम ५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [२][राज्य] शासनाला लेखी आदेशाद्वारे, --

(क) [३][[४][कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी] त्या जागेचे अधिग्रहण करता येईल आणि त्याला इष्ट वाटेल अशा रीतीने अशा कोणत्याही प्रयोजनासाठी तिचा वापर करता येईल किंवा तिची व्यवस्था लावता येईल.]

[५][* * * * * * *]

परंतु, जिच्या संबंधात जमीनमालकाने खबर दिलेली नाही अशा जागेचे [६][अधिग्रहण करण्याबाबत] खंड (क) अन्वये आदेश द्यावयाचा असेल तेव्हा, राज्य शासनाने त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केली पाहिजे आणि पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या दिनांकाला किंवा त्यानंतर ती जागा रिकामी होती किंवा रिकामी झालेली होती असे आदेशात घोषित केले पाहिजे आणि अशी घोषणा ही, ती जागा त्याप्रमाणे रिकामी होती किंवा रिकामी झालेली होती याचा निर्णायक साक्षी पुरावा असेल.

[७][* * * * * * *]

---

[१] "पोस्टाने" या शब्दाऐवजी हे शब्द सन १९५२ चा मुंबई अधिनियम ५ याचे कलम ३(१) अन्वये दाखल करण्यात आले.

[२] "प्रांत" या शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[३] "उपयोग करण्याचा किंवा तिची व्यवस्था लावण्याचा अधिकार आहे" या शब्दांऐवजी हे शब्द सन १९५० चा मुंबई अधिनियम ३९ याचे कलम ३ अन्वये दाखल केले.

[४] "राज्याच्या कारणासाठी किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक कारणासाठी" या शब्दाऐवजी हे शब्द, मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये दाखल करण्यात आले.

[५] खंड (ख) हा, सन १९५२ चा मुंबई अधिनियम ५ याचे कलम ३(२) (एक) अन्वये वगळण्यात आला.

[६] "ताब्यात घेण्यासाठी अथवा भाड्याने देण्यासाठी" या शब्दाऐवजी हे शब्द सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ याचे कलम ३(२) (दोन) अन्वये दाखल केले.

[७] सन १९५२ चा मुंबई अधिनियम ५ याच्या कलम ३(२) (तीन) अन्वये दुसरे परंतुक वगळण्यात आले.

(५) जो कोणताही जमीनमालक अशी खबर, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत देण्यास कसूर करील त्याला त्याचा अपराध सिद्ध झाला असता तीन महिन्यांपर्यंतच्या मुदतीची कैद किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही याप्रमाणे शिक्षा ठोठावण्याजोग्या असतील. आणि जो कोणताही जमीनमालक पोट-कलम (३) च्या तरतुदींचे उल्लंघन करून अशी जागा भाड्याने देईल किंवा तिचा भोगवटा करील किंवा करू देईल त्याला, त्याचा अपराध सिद्ध झाला असता एक वर्षापर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येईल ; तसेच त्याला द्रव्यदंडाचीदेखील शिक्षा ठोठावण्यात येईल.

**स्पष्टीकरण**---या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) यथास्थिति, जमीनमालकाच्या, भाडेकरूच्या किंवा पोट-भाडेकरूच्या भोगवट्यात असलेली जागा, अशा भाडेकरूच्या किंवा पोट-भाडेकरूच्या भोगवट्यात असल्याचे बंद होईल तेव्हा, किंवा अशा भाडेकरूची किंवा पोट-भाडेकरूची भाडेदारी संपविण्यात आल्यामुळे किंवा त्याला तेथून काढून टाकण्यात आल्यामुळे किंवा जमिनीतील त्याचा हितसंबंध अभिहस्तांकित करण्यात आल्यामुळे किंवा इतर कोणत्याही रीतीने हस्तांतरित करण्यात आल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे ती जागा रिकामी आहे किंवा रिकामी झाली आहे असे समजले पाहिजे ; मग ती जागा अशा घरमालकाच्या, भाडेकरूच्या किंवा पोट-भाडेकरूच्या भोगवट्यात असल्याचे ज्या दिनांकाला बंद झाले त्या दिनांकापूर्वी कोणताही संलेख करण्यात आला असला तरी किंवा ती जागा इतर कोणत्याही व्यक्तीच्या भोगवट्यात असली तरी, ती गोष्ट विचारात घेतली जाणार नाही.

(ख) नव्याने उभारलेली किंवा पुन्हा बांधलेली जागा ही, ती अशा रीतीने उभारल्यानंतर किंवा पुन्हा बांधल्यानंतर तिचा प्रथम भोगवटा करण्यात येईपर्यंत रिकामी आहे किंवा रिकामी झाली आहे, असे समजण्यात येईल.

अधिग्रहण चालू ठेवणे.

**७.** (१) जमिनीचे अधिग्रहण (अधिकार चालू ठेवणे) अधिनियम, १९४७ यात काहीही अंतर्भूत असले तरी, [१][राज्य] शासनाला लेखी आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, उक्त अधिनियमान्वये ज्या जमिनीचे अधिग्रहण चालू ठेवले असेल अशी कोणतीही जमीन, उक्त अधिनियमान्वये अधिग्रहणातून मुक्त केली जाईल किंवा कोणत्याही कारणास्तव अधिग्रहणाखाली असण्याचे बंद होईल तेव्हा, ती या अधिनियमान्वये [२][[३][ कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी] अधिग्रहणाखाली असल्याचे चालू राहील ; आणि [१][राज्य] शासन, अशा रीतीने अधिग्रहण चालू राहिलेल्या जमिनीचा, [४][अशा कोणत्याही प्रयोजनासाठी] त्याला इष्ट वाटेल अशा रीतीने वापर किंवा व्यवस्था करू शकेल.

१९४७ चा १७.

---

[१] "प्रांत" या शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[२] सन १९५० चा अधिनियम ३९ याचे कलम ४ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] "राज्याच्या कोणत्याही कारणासाठी किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक कारणासाठी" या शब्दाऐवजी हे शब्द, विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये दाखल करण्यात आले.

[४] हे शब्द, सन १९५० चा मुंबई अधिनियम ३९ याचे कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) अन्वये जी जमीन अधिग्रहणाखाली असल्याचे चालू ठेवले असेल अशा जमिनीच्या संबंधात द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम, हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींनुसार ठरवण्यात येईल व ती त्याप्रमाणे देण्यात येईल :

परंतु, पोट-कलम (१) अन्वये जमिनीचे अधिग्रहण चालू ठेवण्यापूर्वीच्या कालावधीच्या संबंधात त्या जमिनीच्या बाबतीत द्यावयाच्या नुकसानभरपाईसंबंधी केलेले सर्व करार व दिलेले सर्व निवाडे अंमलात असल्याचे चालू राहील आणि ते या अधिनियमाखालील अधिग्रहणाच्या कालावधीबद्दल नुकसानभरपाई देण्याच्या बाबतीत लागू होतील.

१९६८ चा महा. १४ — १९६२ चा महा. ५१

भारत संरक्षण अधिनियम, १९६२ अन्वये करण्यात आलेले अधिग्रहण चालू राहणे.

[१][७-क. मुंबई जमीन अधिग्रहण (सुधारणा) अधिनियम, १९६८ याच्या प्रारंभाच्या वेळी, राज्य शासनाने किंवा भारत संरक्षण अधिनियम, १९६२ या अन्वये राज्य शासनाचे अधिकार ज्याच्याकडे प्रत्यायोजित करण्यात आले होते अशा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने, भारत संरक्षण अधिनियम, १९६२ (ज्याचा या कलमात यापुढे, " संरक्षण अधिनियम," असा उल्लेख करण्यात आला आहे) अन्वये केलेल्या अधिग्रहणाच्या अधीन असलेली सर्व स्थावर मालमत्ता, संरक्षण अधिनियमान्वये केलेल्या अधिग्रहणाच्या आदेशात नमूद केलेली मुदत संपल्यावर लगेच, या अधिनियमान्वये अधिग्रहण करण्यात आलेल्या जमिनी म्हणून मानण्यात येतील आणि अशी कोणतीही मुदत निर्दिष्ट केल्याशिवाय, जणू या अधिनियमान्वये, त्यांचे अधिग्रहण करण्यात आले असल्याप्रमाणे उक्त मालमत्ता, अधिग्रहणाधीन असणे चालू राहील. राज्य शासनाला कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी अशा कोणत्याही जमिनीचा वापर करता येईल किंवा तिची व्यवस्था लावता येईल. अशा कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात नुकसानभरपाई देण्यासंबंधी करण्यात आलेला आणि उक्त मुदतीच्या समाप्तीच्या लगतपूर्वी अंमलात असलेला कोणताही करार किंवा निवाडा, या अधिनियमान्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यात आली असल्याप्रमाणे, अंमलात असल्याचे चालू राहील, आणि तो या अधिनियमाखालील अधिग्रहणाच्या मुदतीत नुकसानभरपाई देण्यास लागू होईल. उक्त मुदतीच्या समाप्तीच्या लगतपूर्वी, अशा कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात असा कोणताही करार किंवा निवाडा अंमलात नसेल तर, नुकसानभरपाईची रक्कम संरक्षण अधिनियम (त्या अन्वये करण्यात आलेले नियम धरून) याच्या तरतुदी जणू अशा प्रयोजनासाठी या अधिनियमात अधिनियमित करण्यात आल्या असल्याप्रमाणे त्यानुसार निश्चित करण्यात येतील व त्या तरतुदी अशा मालमत्तेला लागू असण्याचे चालू राहील आणि अशा रीतीने करण्यात आलेला कोणताही करार किंवा निवाडा हा, संरक्षण अधिनियमान्वये तसेच, या अधिनियमान्वये केलेल्या अधिग्रहणाच्या मुदतीत नुकसानभरपाई देण्यास लागू होईल.]

नुकसानभरपाई देणे.

८. (१) जेव्हा या अधिनियमान्वये कोणत्याही जमिनीचे अधिग्रहण केले असेल किंवा तिचे अधिग्रहण चालू ठेवले असेल तेव्हा, अशा जमिनीत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींना [२][कलम ७ आणि ७क] च्या अधीनतेने, नुकसानभरपाई देण्यात आली पाहिजे. अशा

[१] कलम ७-क हे सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याचे कलम २ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[२] " कलम ७ " या शब्दाऐवजी व आकड्याऐवजी, हे शब्द व आकडे सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याचे कलम ३ अन्वये दाखल केले.

नुकसानभरपाईची रक्कम ही, [1][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने ठरवली पाहिजे व अशा अधिकाऱ्याने, विहित केलेल्या रितीने चौकशी केली पाहिजे. अशा अधिकाऱ्याने प्रकरणातील सर्व परिस्थितीचा विचार करून, त्याला योग्य वाटेल अशी नुकसानभरपाईची रक्कम ठरवली पाहिजे ; आणि ती ठरवताना विशेषकरून भूमि संपादन अधिनियम १८९४ [2][[3][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात] अंमलात असल्याप्रमाणे]च्या कलम २३ च्या पोट-कलम (१) व कलम २४ च्या तरतुदी जेथवर लागू करता येतील तेथवर, त्यांना अनुसरून निर्णय घेतला पाहिजे. १८९४ चा १.

(२) जेव्हा जमिनीत हितसंबंध असलेल्या अनेक व्यक्ती असतील तेव्हा, नुकसानभरपाईची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग यांच्या वाटणीसंबंधी किंवा अशी रक्कम अथवा तिचा कोणताही भाग जिला द्यावयाचा असेल त्या व्यक्तीसंबंधी कोणताही विवाद असल्यास, त्याचा निर्णय अशा अधिकाऱ्याने केला पाहिजे.

(३) जमिनीबद्दल द्यावयाची नुकसानभरपाईची एकूण रक्कम [1][राज्य] शासनाने याबाबत विहित केलेल्या रकमेपेक्षा अधिक नसेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयानंतर—

(क) बृहन्मुंबईत उच्च न्यायालयाकडे, आणि

(ख) इतरत्र जिल्हा न्यायालयाकडे,

अपील करता येईल. असे अपील अशा निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या मुदतीत केले पाहिजे.

[4][**स्पष्टीकरण**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी नुकसानभरपाईची एकूण रक्कम या संज्ञेचा अर्थ, नुकसानभरपाईची रक्कम ठोक रकमेत देण्यात येईल त्या बाबतीत, अशी ठोक रक्कम आणि ती नियत कालावधीने देण्यात येईल त्या बाबतीत, विहित करण्यात येईल अशी नुकसानभरपाईच्या रकमेच्या पटीतील रक्कम, असा आहे.]

(४) पोट-कलम (३) अन्वये केलेल्या अपिलात दिलेल्या कोणत्याही निर्णयावर आणखी कोणतेही अपील करता येणार नाही.

अभिलेख मागवण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[5][**८-क-१.** राज्य शासनास,—

(क) कलम ८ च्या पोट-कलम (३) अन्वये कोणतेही अपील करता येत नसेल अशा बाबतीत, किंवा

(ख) ज्या प्रकरणांत असे अपील करता येत असेल परंतु, उक्त पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अवधीत ते दाखल केले नसेल त्या बाबतीत, असे अपील

---

[1] "प्रांत" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[2] हे कंस व शब्द, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३ चे कलम ५ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[3] "हस्तांतरित केलेले प्रदेश वगळून पुनर्रचनापूर्व मुंबई राज्य" या शब्दाऐवजी हे शब्द, महाराष्ट्र विधी अनुकूलन आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आले.

[4] हे स्पष्टीकरण, सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २ चे कलम ३ अन्वये जादा समाविष्ट करण्यात आले.

[5] ८-क-१ हे कलम, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ चे कलम ३ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

करण्याची मुदत संपल्यानंतर उक्त कलम ८ चे पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये ज्याने निर्णय दिला असेल त्या अधिकाऱ्याच्या चौकशीचा किंवा कामकाजाचा कायदेशीरपणा, औचित्य किंवा नियमानुसारिता याबाबत स्वतःची खात्री करून घेण्यासाठी अशा चौकशीचा किंवा कामकाजाचा अभिलेख मागविता येईल. राज्य शासनाने या कलमान्वये दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल.]

[1][८-क. जेव्हा या अधिनियमान्वये कोणत्याही जागेचे अधिग्रहण करण्यात आले असेल तेव्हा, राज्य शासनास, त्या जागेच्या जमीन मालकाशी समुचित शासनाने केलेल्या कोणत्याही करारनाम्याच्या अधीनतेने, जमीन मालकाला लेखी आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, त्या जमीन मालकाने ती जागा चांगल्या व राहण्यास योग्य अशा स्थितीत ठेवण्यासाठी राज्य शासनाच्या मते आवश्यक किंवा पुरेशा असतील अशा आणि अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा दुरूस्त्या त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत केल्या पाहिजेत. मग अशा जागेचे अधिग्रहण, मुंबई जमीन अधिग्रहण (सुधारणा) अधिनियम, १९५० अंमलात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर करण्यात किंवा चालू ठेवण्यात आलेले असो. जर जमीन मालकाने अशा दुरूस्त्या करण्यात कसूर केली तर, राज्य शासनास अशा दुरूस्त्या त्या जमीन मालकाच्या खर्चाने करवून घेता येतील आणि त्याबद्दलचा खर्च हा, वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीस बाध येऊ न देता, जमीन मालकाला द्यावयाच्या नुकसानभरपाईच्या रकमेतून वजा करून घेता येईल.] आवश्यक त्या दुरूस्त्या करण्याचे जमीन-मालकाचे कर्तव्य. १९५० चा मुंबई २.

१९८८ चा मुंबई ३. [2][८कक. कलम ८-क द्वारे देण्यात आलेल्या अधिकारांना बाध येऊ न देता, मुंबई महापालिका अधिनियमाच्या तरतुदी, या अधिनियमान्वये अधिग्रहण केलेल्या किंवा अधिग्रहण चालू असलेल्या जागांच्या संबंधात लागू होतील. परंतु, त्या कलमाच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासन किंवा राज्य शासन परवानगी देईल त्याबाबतीत, ज्या व्यक्तीला अशी कोणतीही जागा देण्यात आली असेल किंवा जिला तिचा भोगवटा करण्याचे किंवा कब्जा असल्याचे चालू ठेवण्याची परवानगी देण्यात आली असेल ती व्यक्ती भोगवटाकार असेल असा त्यात फेरफार केला पाहिजे आणि त्याप्रमाणे राज्य शासनाला किंवा अशा व्यक्तीला, उक्त कलम ४९९ मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत, त्यात उल्लेखिलेले काम, त्या कलमाच्या तरतुदींच्या अधीनतेने करता येईल, परंतु, असे कोणतेही काम करण्यासाठी आलेल्या वाजवी खर्चाची स्वतःला किंवा अशा व्यक्तीला प्रतिपूर्ती करून देण्यासाठी राज्य शासनाला अशा खर्चाची रक्कम मालकाकडून वसूल करता येईल आणि त्याला, मालकाला वेळोवेळी देय होईल अशा नुकसानभरपाईच्या रकमेतून ती रक्कम वजा करून घेता येईल.] अधिग्रहण केलेल्या जागांना सन १८८८ चा मुंबई अधिनियम ३ याचे कलम ४९९ लागू करणे.

[3][८-ख. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याच्या मते जे पद शासनाच्या सहायक सचिवाच्या किंवा तहसिलदाराच्या पदापेक्षा कमी दर्जाचे असेल असे पद धारण करणाऱ्या किंवा धारण केलेल्या अधिकाऱ्याची, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक.

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्र. २ याचे कलम ४ अन्वये, कलम ८-क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९१ याचे कलम ३ अन्वये, कलम ८-कक समाविष्ट करण्यात आले.

[3] "कलम ८-ख ऐवजी कलमे ८-ख ते ८-ग ही, सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याचे कलम ३ अन्वये दाखल करण्यात आली.

अशा क्षेत्रात किंवा अशा जमिनीबाबत किंवा जागांबाबत किंवा कोणत्याही क्षेत्रांतील जमिनीच्या किंवा जागांच्या वर्गाबाबत या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक करता येईल ; आणि एकाच क्षेत्रातील वेगवेगळ्या जमिनीसाठी किंवा जागांसाठी किंवा जमिनीच्या किंवा जागांच्या वेगवेगळ्या वर्गासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून एकापेक्षा अधिक अधिकारी नेमता येतील.

काढून टाकण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार.

**८-ग.** (१) सक्षम प्राधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर त्याची अशी खात्री झाली असेल की,---

(क) या अधिनियमाखाली अधिग्रहण केलेली किंवा अधिग्रहणाखाली असलेली कोणतीही जमीन किंवा जागा दिलेल्या शासकीय व्यक्तीने किंवा तिचा भोगवटा करण्यास प्राधिकृत केलेल्या किंवा परवानगी दिलेल्या किंवा त्यावेळी भोगवटा करीत असलेल्या व्यक्तीने, मुंबई जमीन अधिग्रहण आणि मुंबई सरकारी जागातून (काढून लावण्याबाबत) १९८१ चा
(सुधारणा) अधिनियम, १९८० याच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर :— महा. ३५.

(एक) तिच्याकडून येणे असलेली अशा जमिनीबाबतची किंवा जागांबाबतची मासिक नुकसानभरपाई दोन महिन्यांहून अधिक मुदतीसाठी दिलेली नसेल ;

(दोन) राज्य शासनाच्या किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय अशी संपूर्ण जमीन किंवा जागा किंवा तिचा कोणताही भाग पोट-भाड्याने दिलेला असेल ;

(तीन) ज्या अटींवर व शर्तींवर तिला अशा जमिनीचा किंवा जागेचा भोगवटा करण्याचा प्राधिकार देण्यात आला असेल त्या स्पष्ट किंवा गर्भित अटींचे व शर्तींचे उल्लंघन होईल अशी कोणतीही कृत्ये केली असतील किंवा करीत असेल ; किंवा

(चार) अशी जमीन किंवा जागा अनधिकृतपणे भोगवट्यात ठेवलेली असेल ; किंवा

(ख) कोणत्याही व्यक्तीने अशी जमीन किंवा जागा अनधिकृतपणे भोगवट्यात ठेवलेली असेल; किंवा

(ग) अशी जमीन किंवा जागा अधिग्रहणातून मुक्त करावयाची असेल,

तर, सक्षम प्राधिकाऱ्यास त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, लेखी आदेशाद्वारे ज्या व्यक्तीला अशी जमीन किंवा जागा देण्यात आली असेल त्या व्यक्तीला किंवा ज्या व्यक्तीला तिचा भोगवटा करण्याचा प्राधिकार किंवा परवानगी देण्यात आली असेल त्या व्यक्तीला किंवा अशी जमीन किंवा जागा त्यावेळी ताब्यात असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला आदेश बजावल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत ती रिकामी करण्याचा आणि सक्षम प्राधिकाऱ्याच्या किंवा त्याने या बाबतीत पदनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या कब्जात देण्याचा निदेश देता येईल, असा आदेश, कलम १३ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने संबंधित व्यक्तीवर बजावण्यात येईल.

(२) (क) कोणत्याही व्यक्तीविरुद्ध पोट-कलम (१) अन्वये एखादा आदेश काढला जाण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याने सर्व संबंधित व्यक्तींना, काढून टाकण्याचा आदेश का देण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्यास फर्माविणारी एक लेखी नोटीस यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने काढली पाहिजे.

(ख) अशा नोटीशीद्वारे—

(एक) ज्या कारणावरून काढून टाकण्याचा आदेश देण्याची योजिले असेल ते कारण विनिर्दिष्ट केले पाहिजे.

(दोन) सर्व संबंधित व्यक्तींना, म्हणजेच उक्त जमीन किंवा जागा ज्यांच्या ताब्यात आहे किंवा असेल किंवा ताब्यात ठेवण्यास आपल्याला प्राधिकृत केल्याचा दावा सांगत असतील अशा सर्व व्यक्तींना प्रस्तावित आदेशाविरुद्ध कोणतेही कारण असल्यास, ते नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल, त्या दिनांकास किंवा तत्पूर्वी दाखविण्यास सांगण्यात आले पाहिजे.

(तीन) अशी नोटीस त्या व्यक्तीला किंवा तिच्या कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला नोंदणीकृत डाकेने पाठवून किंवा व्यक्तिशः स्वाधीन करून किंवा देऊन किंवा नोटीशीची अधिप्रमाणित प्रत, ती ज्या जमिनीशी किंवा जागेशी संबंधित असेल त्या जमिनीच्या किंवा जागेच्या एखाद्या ठळक भागावर चिकटवून नोटीस बजावण्यात आली पाहिजे.

आणि त्यानंतर अशी नोटीस सर्व संबंधित व्यक्तींना रीतसर देण्यात आली आहे व त्यांच्यावर रीतसर बजावण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

(३) नोटिशीच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीने सादर केलेले कोणतेही लेखी निवेदन आणि कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेले कोणतेही दस्तऐवज त्या प्रकरणाच्या अभिलेखाबरोबर दाखल केले पाहिजेत आणि अशा व्यक्तीला यासंबंधात अधिवक्ता, न्यायप्रतिनिधी किंवा वकील यांच्या सहाय्याने सक्षम प्राधिकाऱ्यासमोर आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(४) पोट-कलम (१) अन्वये कोणताही आदेश देण्यासाठी चौकशीची कार्यवाही करण्याच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याला, कलम १० अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्याला जे अधिकार देण्यात आलेले आहेत, तेच अधिकार असतील.

सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरूद्ध अपिले.

**८-घ.** (१) कलम ८-ग अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या, काढून टाकण्याबाबतच्या प्रत्येक आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये दाखल करावयाचे अपील, कलम ८-ग, पोट-कलम (१) अन्वये दिलेला आदेश बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत दाखल केले पाहिजे :

परंतु, अपीलकारास वेळेवर अपील दाखल करण्यास पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता याबाबत राज्य शासनाची खात्री झाल्यास, त्या तीस दिवसांची उक्त मुदत संपल्यावर अपील दाखल करून घेता येईल.

(३) सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आलेले असेल त्याबाबतीत, राज्य शासनास, त्यास विनिर्दिष्ट करण्यास योग्य वाटेल अशा मुदतीसाठी व अशा अटीवर त्या आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

(४) कलम ८-ग अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक आदेश, राज्य शासनाकडे करण्यात आलेल्या अपिलाच्या अधीन राहून, आणि अशा अपिलावर राज्य शासनाने दिलेला प्रत्येक आदेश, अंतिम आणि निर्णायक असेल.

अधिग्रहण केलेली जमीन वाट्यास देणे, हे लायसन्स असल्याप्रमाणे मानणे आणि येणे रकमा जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीयोग्य असणे.

८-ङ. (१) राज्य शासनाने या अधिनियमान्वये अधिग्रहण केलेली किंवा अधिग्रहणाखाली चालू ठेवलेली कोणतीही जमीन किंवा जागा कोणत्याही व्यक्तीला देणे किंवा अशी जमीन किंवा जागा कोणत्याही व्यक्तीच्या भोगवट्यात किंवा ताब्यात असण्याचे चालू ठेवणे किंवा चालू ठेवण्यास परवानगी देणे, हे, अशा जमिनीचा किंवा जागेचा वापर आणि भोगवटा करण्याचे अशा व्यक्तीच्या नावाने दिलेले लायसन्स असल्याचे मानण्यात येईल.

(२) राज्य शासनाने अशी जमीन किंवा जागा ज्या व्यक्तीच्या वाट्यास दिली असेल अशी व्यक्ती, अशी जमीन किंवा जागा ज्या अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून देण्यात आली असेल त्या अटींखाली व शर्तींखाली जी रक्कम देण्यास पात्र असेल अशी कोणतीही रक्कम राज्य शासनाला देण्यात कसूर करील किंवा ज्या व्यक्तीने अशी जमीन किंवा जागा भोगवट्यात किंवा ताब्यात ठेवण्याचे चालू ठेवले असेल किंवा जिला असा भोगवटा किंवा ताबा चालू ठेवण्यास परवानगी देण्यात आली असेल अशी कोणतीही व्यक्ती, अशा भोगवट्यासाठी किंवा ताब्यासाठी तिने द्यावयाची, जी रक्कम राज्य शासन ठरवून देईल अशी नुकसानभरपाईची कोणतीही रक्कम देण्यात कसूर करील तर, अशी कोणतीही रक्कम किंवा येणे रक्कम—मग ती मुंबई जमीन अधिग्रहण आणि सरकारी जागातून (काढून लावण्याबाबत) (सुधारणा) अधिनियम, १९८० याच्या प्रारंभापूर्वी असो किंवा नंतर असो—वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीला बाध न आणता, तिच्याकडून किंवा जमिनीचा किंवा जागेचा त्यावेळी भोगवटा करणाऱ्या किंवा ती ताब्यात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

सन १९८१ चा महा. ३५.

अधिकारितेस रोध.

८च. कोणत्याही न्यायालयास, कलम ८-ग मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणावरून या अधिनियमान्वये अधिग्रहण केलेल्या किंवा अधिग्रहण करण्याचे चालू ठेवलेल्या कोणत्याही जमिनीवरून किंवा जागेतून कोणत्याही व्यक्तीला काढून टाकण्याच्या संबंधातील किंवा अशा जमिनीच्या किंवा जागेच्या वापरासाठी देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या किंवा इतर येणे रकमेच्या वसुलीच्या संबंधातील कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करून घेण्याची अधिकारिता असणार नाही.

अधिग्रहणातून मुक्तता.

९. (१) [१][राज्य] शासनास, या अधिनियमान्वये अधिग्रहण केलेली कोणतीही जमीन कोणत्याही वेळी अधिग्रहणातून मुक्त करता येईल किंवा तिचे अधिग्रहण चालू ठेवता येईल.

---

[१] "प्रांत" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये दाखल करण्यात आला.

[1][(१क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने,—

१९७३ चा महा. ५१. (क) मुंबई जमीन अधिग्रहण (सुधारणा) अधिनियम, १९७३ च्या प्रारंभापूर्वी या अधिनियमाखाली अधिग्रहण केलेली किंवा अधिग्रहणाधीन असलेली कोणतीही जमीन, अशा प्रारंभापासून [2][चोवीस वर्षांचा] कालावधी संपल्यावर किंवा संपण्यापूर्वी मुक्त केली पाहिजे.

(ख) अशा प्रारंभानंतर या अधिनियमाखाली अधिग्रहण केलेली कोणतीही जमीन राज्य शासनाने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या किंवा अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे जमिनीचा ताबा दिल्याच्या, स्वाधीन केल्याच्या किंवा त्याने तो घेतल्याच्या दिनांकापासून [2][ चोवीस वर्षांचा] कालावधी संपल्यावर किंवा संपण्यापूर्वी, मुक्त केली पाहिजे.]

(२) (क) [3][पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (१क) अन्वये] अशा प्रकारे मुक्तता केल्यावर ती जमीन [4][राज्य] शासनाच्या ताब्यात दिली गेली असेल त्या दिनांकाला ती ज्या स्थितीत असेल त्याच स्थितीत शक्यतोवर ठेवली पाहिजे, आणि [4][राज्य] शासनाने, रास्त झीजतूट झाल्यामुळे किंवा अनिवार्य बळाचा वापर केलेला असेल त्याव्यतिरिक्त इतर प्रकारे, त्या जमिनीचा कोणताही ऱ्हास झाला असल्यास त्याबद्दल नुकसानभरपाई दिली पाहिजे :

परंतु, [4][राज्य] शासनाने जमिनीचा कब्जा ज्या दिनांकाला घेतला असेल त्या दिनांकाला त्या जमिनीवर असलेल्या आणि ज्यांच्याबद्दल नुकसानभरपाई देण्यात आलेली असेल अशा कोणत्याही बांधकामाला, झाडांना किंवा पिकांना या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

चा ३५. (ख) [4][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने त्याला योग्य वाटेल अशी नुकसानभरपाईची रक्कम ठरविली पाहीजे आणि त्याचा निर्णय [4][राज्य] शासनाकडे करावयाच्या अपिलास अधीन राहून, अंतिम असेल. असे अपील निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या मुदतीत केले पाहिजे.

(३) जेव्हा कोणतीही जमीन अधिग्रहणातून मुक्त करावयाची असेल तेव्हा, राज्य शासनाला जी कोणतीही चौकशी करणे त्याला योग्य वाटत असेल ती चौकशी केल्यानंतर, जमिनीचा कब्जा कोणत्या व्यक्तीला द्यावयाचा ते लेखी आदेशाद्वारे निर्देशित करता येईल.

---

[1] पोट-कलम (१क) हे, सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याचे कलम ३(अ) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[2] "एकवीस वर्षांचा" या शब्दाऐवजी हे शब्द सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याचे कलम २ अन्वये दाखल करण्यात आले.

[3] १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ च्या कलम ३(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] "प्रांत" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

(४) पोट-कलम (३) अन्वये दिलेल्या आदेशात निर्देशित केलेल्या व्यक्तीला जमिनीचा कब्जा दिला असता [१][राज्य] शासनाची अशा प्रकारे कब्जा देण्याची जी जबाबदारी असेल त्या सर्व जबाबदारीतून त्याची पूर्णपणे मुक्तता होईल ; परंतु त्यामुळे, ज्या व्यक्तीच्या कब्जात ती जमीन अशा रीतीने देण्यात आली असेल त्या व्यक्तीविरुद्ध अशा जमिनीच्या संबंधात इतर कोणत्याही व्यक्तीला योग्य तो कायदेशीर इलाज करून जे हक्क बजावता येत असतील त्या हक्कांना बाध येणार नाही.

(५) अधिग्रहण केलेली जमीन ज्या व्यक्तीच्या कब्जात द्यावयाची असेल ती व्यक्ती सापडत नसेल आणि तिचा कोणताही अभिकर्ता नसेल किंवा त्याच्या वतीने जमिनीचा कब्जा घेण्याचा अधिकार दिलेली इतर कोणतीही व्यक्ती नसेल तेव्हा, [१][राज्य] शासनाने नोटीस काढून त्याद्वारे ती जमीन अधिग्रहणातून मुक्त झाली आहे असे जाहीर केले पाहिजे ; आणि अशी नोटीस अशा जमिनीच्या एखाद्या ठळक भागावर लावण्याची व्यवस्था केली पाहिजे व तसेच ती **राजपत्रात** प्रसिद्ध केली पाहिजे.

(६) पोट-कलम (५) मध्ये उल्लेखिलेली नोटीस **राजपत्रात** प्रसिद्ध झाली की, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली जमीन, अशा रीतीने नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकाला व त्या दिनांकापासून अधिग्रहणास पात्र असल्याचे बंद होईल. आणि ती, तिचा कब्जा मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीच्या स्वाधीन करण्यात आली आहे असे समजण्यात येईल ; आणि उक्त दिनांकानंतरच्या कोणत्याही नुकसानभरपाईबाबत किंवा इतर मागणीबाबत [१][राज्य] शासन दायी असणार नाही.

(७) कोणतीही जमीन अधिग्रहणातून मुक्त करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा जमिनीचा कब्जा [१][राज्य] शासनाने ज्या व्यक्तीला दिला असेल त्या व्यक्तीने आणि अशी जमीन इतर कोणत्याही व्यक्तीच्या भोगवट्यात असल्यास तिने, [१][राज्य] शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे अशा जमिनीचा कब्जा सोपवावा असा निदेश [१][राज्य] शासन आदेशाद्वारे देऊ शकेल.

[२][(८) मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण, मुंबई जमीन १९४८ चा
अधिग्रहण आणि मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) (सुधारणा) अधिनियम, मुंबई ३३.
१९९६ हा अंमलात येण्याच्या दिनांकास, या अधिनियमान्वये, अधिग्रहण करण्यात आलेल्या १९९७ चा
किंवा अधिग्रहण चालू ठेवण्यात आलेल्या आणि उक्त दिनांकास, [३][ अशा जागा ज्यांच्या महा. १६.
भोगवट्यात किंवा कब्जात होत्या] अशा शासकीय वाटपप्राप्त व्यक्तीस वाटप करण्यात आलेल्या सर्व जागा, अधिग्रहणातून मुक्त करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल ; आणि अशा जागांच्या बाबतीत, राज्य शासन, किंवा यथास्थिति, स्पष्टीकरणाच्या खंड (ख) मध्ये निर्देश केलेली शासकीय वाटपप्राप्त व्यक्ती, मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व
निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याच्या कलम १५ब च्या तरतुदींच्या आधारे, १९४७
भाडेकरी होईल, आणि अशा जागेच्या बाबतीत कोणतीही नुकसानभरपाई देय असल्यास चा
ती, नुकसानभरपाईची रक्कम, जणू काही अशी जागा या कलमान्वये प्रत्यक्षात मुक्त मुंबई
करण्यात आली होती असे समजून निर्धारित करण्यात येईल व तिच्या हक्कदार व्यक्तीस ५७.
देण्यात येईल.

---

[१] "प्रांत" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आला.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५ द्वारे पोट-कलम (८) जादा दाखल केले.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ४(अ) द्वारे हा मजकूर दिनांक ७ डिसेंबर, १९९६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी " शासकीय वाटपप्राप्त व्यक्ती " या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

१९६१ चा महा. २४. १९९७ चा महा. १६.

(क) कोणत्याही निवासेतर प्रयोजनाकरिता, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही विभागाला किंवा कार्यालयाला किंवा पूर्णतः किंवा अंशतः राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही सार्वजनिक क्षेत्र उपक्रमाला किंवा महामंडळाला किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही सहकारी संस्थेला किंवा कोणत्याही विदेशी दूतावासाला, राज्य शासनाकडून वाटप करण्यात आलेल्या आणि मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण, मुंबई जमीन अधिग्रहण आणि मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) (सुधारणा) अधिनियम, १९९६ हा अंमलात आल्याच्या दिनांकाला, [१][त्यांच्या भोगवट्यात किंवा कब्जात असलेल्या] अशा अधिग्रहण करण्यात आलेल्या किंवा अधिग्रहण चालू ठेवण्यात आलेल्या कोणत्याही जागांच्या संबंधात अशा कार्यालयाचा किंवा विभागाचा किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमाचा किंवा महामंडळाचा किंवा संस्थेचा किंवा दूतावासाचा मुख्य प्रभारी अधिकारी ; आणि

१९९७ चा महा. १६.

(ख) अधिग्रहण करण्यात आलेल्या किंवा अधिग्रहण चालू ठेवण्यात आलेल्या ज्या जागांचे राज्य शासनाने कोणत्याही व्यक्तीला निवासी प्रयोजनासाठी वाटप केले असेल व मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण, मुंबई जमीन अधिग्रहण आणि मुंबईच्या सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) (सुधारणा) अधिनियम, १९९६ अंमलात येण्याच्या दिनांकाला [२][अशी व्यक्ती किंवा तिच्या कायदेशीर वारसाच्या निवासासाठी अशा जागेचा भोगवटा करत असेल किंवा ती जागा कब्जात ठेवत असेल अशा कोणत्याही जागांच्या संबंधात, अशी व्यक्ती किंवा असा कायदेशीर वारस.]

[३][**९क.** राज्य शासनाने, अधिग्रहण करण्याच्या वेळी किंवा त्यानंतर, कलम १३ मध्ये नमूद केलेले आदेश प्रसिद्ध करण्यासाठी किंवा बजावण्यासाठी त्यात तरतूद केलेल्या रीतीने यथास्थिति, प्रसिद्ध केलेल्या किंवा बजावण्यात आलेल्या लेखी नोटिशीवरून, अधिग्रहण करण्यात आलेल्या किंवा अधिग्रहण करावयाच्या जमिनीच्या मालकास किंवा जागेच्या मालकास, कलम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, अशा जमिनीच्या किंवा जागेच्या संबंधात नुकसानभरपाई मिळवण्याबाबतची त्याची हक्कमागणी सादर करण्यास फर्मावले पाहिजे.

अधिग्रहण केलेल्या किंवा करावयाच्या जमिनीच्या किंवा जागेच्या मालकाला नुकसानभरपाई-करिता अर्ज सादर करण्याविषयी नोटीस देण्याबाबत.

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) (एक) द्वारे हा मजकूर दिनांक ७ डिसेंबर, १९९६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) (दोन) द्वारे हा मजकूर दिनांक ७ डिसेंबर, १९९६ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम ३ द्वारे कलम ९क, ९ख आणि ९ग समाविष्ट केले.

नुकसानभरपाई-करिता करावयाचा अर्ज कोणत्या अधिकाऱ्याकडे कशा रीतीने आणि किती मुदतीच्या आत करावयाचा.

**९ख.** (१) नुकसानभरपाई ठरविण्यासाठी किंवा देण्यासाठी केलेला प्रत्येक अर्ज हा, नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यासाठी कलम ८ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा नमुन्यात, आणि अशा माहितीसह केला पाहिजे.

(२) असा अर्ज,---

(क) कलम ८, पोट-कलम (१) अन्वये नुकसानभरपाईसाठी केलेल्या हक्कमागणीच्या बाबतीत, ज्या दिनांकास, कलम ९क अन्वयेची नोटीस यथास्थिति, प्रसिद्ध करण्यात किंवा बजावण्यात आली असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत केला पाहिजे.

(ख) नुकसानभरपाईच्या थकबाकीच्या बाबतीत, जेव्हा नुकसानभरपाईची रक्कम ठरविणाऱ्या आदेशावरून नुकसानभरपाईची रक्कम पुढील दिनांकास किंवा हप्त्यांनी किंवा ठराविक मुदतीने देण्यात यावी असे फर्माविण्यात आले असेल तेव्हा, ज्या दिनांकास यथास्थिति, रक्कम, हप्ता किंवा ठराविक मुदतीने द्यावयाची रक्कम अशा रीतीने देण्याजोगी होईल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत केला पाहिजे.

(ग) कलम ९, पोट-कलम (२) खंड (क) [१][आणि पोट-कलम (८)] अन्वये नुकसानभरपाईसाठी केलेल्या हक्कमागणीच्या बाबतीत, उक्त कलमान्वये जमिनीचा कब्जा ज्या दिनांकास परत देण्यात आला असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत केला पाहिजे.

(३) भारतीय मुदत मर्यादा अधिनियम, १९५८,* याची कलमे ४ आणि ५ आणि कलम १२ चे पोट-कलम (१) यातील तरतुदी, त्या ज्याप्रमाणे त्या अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीत वर्णन केलेल्या अर्जाच्या संबंधात लागू होतात त्याचप्रमाणे, योग्य त्या फेरफारांसह या अधिनियमान्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यासाठी किंवा देण्यासाठी करावयाच्या अर्जाच्या संबंधात लागू असतील. १९०८ चा ९.

नुकसान-भरपाईची रक्कम ठरविण्यासाठी करावयाचा अर्ज वेळेवर न केल्यास नुकसान-भरपाईची रक्कम एकतर्फी ठरविणे.

**९ग.** जर कलम ९ख, पोट-कलम (२), खंड (क) अन्वये नुकसानभरपाईसाठी करावयाचा अर्ज, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत करण्यात आला नाही तर, अधिकाऱ्याला नुकसानभरपाईची रक्कम एकतर्फी ठरविता येईल व तिचे संविभाजन करता येईल आणि अशा रीतीने ठरविण्यात किंवा संविभाजन करण्यात आलेली रक्कम कलम, ८, पोट-कलम (३) आणि कलम ८-क १ यातील, तरतुदींच्या अधीनतेने, मालकावर किंवा जमीनमालकावर बंधनकारक असेल :

परंतु, जर मालकाने किंवा जमीनमालकाने नोटीस योग्य रीतीने प्रसिद्ध करण्यात किंवा बजाविण्यात आली नव्हती किंवा त्याला आपली हक्कमागणी वेळेवर करण्यास पुरेशा कारणाने प्रतिबंध झाला हे अधिकाऱ्याच्या निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्या अधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीने दाखवून दिल्यास, अधिकाऱ्याने आपला

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

* आता मुदत मर्यादा अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) पहा.

निर्णय रद्द केला पाहिजे आणि मालकाने किंवा जमिनमालकाने केलेली कोणतीही हक्कमागणी विचारात घेतल्यानंतर नुकसानभरपाईची रक्कम किंवा तिचे संविभाजन ठरविण्याच्या कामास सुरुवात केली पाहिजे.]

**१०.** कलम ८ अन्वये चौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याला, पुढील बाबतीत दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित केलेले आहेत तेच अधिकार असतील— चौकशीचे अधिकार.

(क) प्रतिज्ञालेखांद्वारे वस्तुस्थिती सिद्ध करणे,

(ख) कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व उपस्थित होण्यास भाग पाडणे आणि शपथेवर त्याची तपासणी करणे,

(ग) दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे, आणि

(घ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

**११.** (१) [१][राज्य] शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, कलम ५ किंवा ६ [२][किंवा कलम ८क चे पोट-कलम (१)] किंवा कलम ९ चे पोट-कलम (७) अन्वये जिच्या संबंधात आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही जमिनीचा कब्जा घेता येईल आणि अशा जमिनीचा कब्जा घेण्यासाठी अशा अधिकाऱ्याच्या मते वाजवीरीत्या आवश्यक असेल असा बळाचा वापर करता येईल किंवा करविता येईल. कब्जा घेण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) खाली ज्या व्यक्तीकडून जमिनीचा कब्जा घेण्यात आला असेल अशा व्यक्तीला १५ दिवसांची नोटीस दिल्यानंतर [१][राज्य] शासन, अशा जमिनीवर राहिलेली मालमत्ता, तेथून हलवू शकेल किंवा तिचा जाहीर लिलाव करून तिचा विनियोग करू शकेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये ज्या मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल त्या बाबतीत, विक्रीचा खर्च वजा जाता उरलेले विक्रीपासूनचे उत्पन्न, [१][राज्य] शासनाला जी व्यक्ती किंवा ज्या व्यक्ती ते मिळण्यास हक्कदार आहे किंवा आहेत असे वाटेल अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींना दिले पाहिजे.

**१२.** (१) [१][राज्य] शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याच्या दृष्टीने, [३][या अधिनियमान्वये] जिचे अधिग्रहण करण्यात आले असेल किंवा चालू ठेवले असेल किंवा अधिग्रहण करण्याचे किंवा अधिग्रहण चालू ठेवण्याचे योजिले असेल अशा कोणत्याही जमिनीसंबंधी ज्या कोणत्याही व्यक्तीला जी माहिती असेल ती माहिती पुरविण्याविषयी तिला विशेष आदेशाद्वारे फर्माविता येईल. माहिती मिळवण्याचा अधिकार.

---

[१] "प्रांत" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आला.

[२] हे शब्द, कंस, आकडे व अक्षरे, सन १९८१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५ याचे कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[३] हे शब्द, सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम ५ अन्वये जादा दाखल करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे अशी माहिती पुरविण्याविषयी फर्माविण्यात आलेल्या व्यक्तीवर, भारतीय दंड संहितेची कलमे १७६ व १७७ च्या अर्थानुसार, तसे करणे कायदेशीररित्या बंधनकारक असल्याचे समजले जाईल. १८६० चा ४५.

आदेश प्रसिद्ध करणे व ते बजावणे.

**१३.** (१) कलमे ५, ६, ७ [१][८क [२][किंवा ८ग] [३]** किंवा] कलम ९ चे पोट-कलम (७) किंवा कलम १२ खाली देण्यात आलेला प्रत्येक आदेश,—

(क) जर तो सर्वसाधारण स्वरूपाचा आदेश असेल व अनेक व्यक्तींच्या एखाद्या वर्गावर परिणाम करणारा असेल तर, याबाबत केलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने तो प्रसिद्ध केला पाहिजे.

(ख) एखाद्या व्यक्तीवर, महामंडळावर किंवा भागीदारी संस्थेवर परिणाम करणारा आदेश असेल तर, तो आदेश दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या पहिल्या अनुसूचीतील, यथास्थिति, आदेशिका एकोणतीसच्या नियम २ किंवा आदेशिका ३० चा नियम ३ मध्ये, आज्ञापत्र बजावण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीने तो बजावण्यात आला पाहिजे. १९०८ चा ५.

(ग) जर तो आदेश महामंडळ किंवा भागीदारी संस्था यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींवर व्यक्तिशः परिणाम करणारा असेल तर, तो, त्या व्यक्तीवर पुढील रीतीने बजावला पाहिजे—

(एक) व्यक्तिशः तो आदेश त्या व्यक्तीकडे सुपूर्द करून किंवा देऊन,

(दोन) डोकेने, किंवा

(तीन) ती व्यक्ती सापडत नसेल तर, तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ पुरुषाकडे त्या आदेशाची एक अधिकृत प्रत ठेवून किंवा ज्या जागेत ती अखेरीस राहिली असेल, किंवा धंदा केला असेल किंवा कमाईसाठी काम केले असेल अशा जागेच्या एखाद्या ठळक ठिकाणी अशी प्रत चिकटवून.

(२) कलमे ५, ६, ७ [४][८क [५][किंवा ८ग] [६]** किंवा] कलम ९ चे पोट-कलम (७) किंवा कलम १२ अनुसार एखाद्या व्यक्तीला आदेश रीतसर कळवण्यात आला होता की नव्हता असा प्रश्न उपस्थित झाल्यास, पोट-कलम (१) मधील आवश्यक गोष्टींचे अनुपालन

---

[१] "८अ किंवा ८ब किंवा ९अ" हे आकडे, अक्षरे व शब्द सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याचे कलम ७ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[२] १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ च्या कलम ५ अन्वये हे शब्द "किंवा ८ब" या शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

[३] "किंवा ९अ" हा शब्द, आकडा व अक्षर सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ चे कलम ५ अन्वये वगळण्यात आले.

[४] "८क किंवा ८ख किंवा ९ग" हे आकडे, अक्षरे आणि शब्द, सन १९५० चा मुंबई अधिनियम, २ याचे कलम ७ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[५] १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ च्या कलम ५ अन्वये हे शब्द "किंवा ८ख" या शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

[६] "९अ" हा शब्द, आकडा व अक्षर, सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ चे कलम ५ अन्वये वगळण्यात आला.

केलेले असणे हे त्या व्यक्तीला याप्रमाणे कळवण्यात आले असल्याचा निर्णायक पुरावा असेल ; परंतु, उक्त आवश्यक गोष्टींचे पालन करण्यास कसूर झाल्यास त्यामुळे त्या व्यक्तीला अशा रीतीने कळवण्यात आले होते हे इतर मार्गाने सिद्ध करण्यास प्रतिबंध असणार नाही किंवा अशा आदेशाच्या विधिग्राह्यतेस त्यामुळे प्रतिबंध होणार नाही.

**१४.** या अधिनियमान्वये अन्यथा, देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांना बाध येऊ न देता, [१][राज्य] शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबत अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला कोणत्याही जमिनीच्या संबंधात या अधिनियमाखाली आदेश द्यावा किंवा कसे आणि द्यायचा झाल्यास कशा रीतीने द्यावा हे ठरविण्यासाठी किंवा या अधिनियमाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करून घेण्यासाठी अशा जमिनीवर प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल. जमिनीवर प्रवेश करण्याचा व तिची तपासणी करण्याचा अधिकार.

**१५.** [१][राज्य] शासनाला, **राजपत्रात,** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, या अधिनियमान्वये त्याला दिलेल्या कोणत्याही अधिकाराच्या किंवा त्याच्यावर लादलेल्या कोणत्याही कर्तव्याच्या बाबतीत, त्या निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी कोणतीही परिस्थिती व अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यानुसार राज्य शासनाच्या मते जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी नसलेला जो अधिकारी अशा रीतीने विनिर्दिष्ट करण्यात येईल तो अधिकारी, ते अधिकार वापरील किंवा ती कर्तव्य पार पाडील. कामांचे प्रत्यायोजन.

**१६.** [१][राज्य] शासनास, नियमांद्वारे, उक्त नियमांत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटींवर व शर्तींवर कोणत्याही जमिनीला कलम ५ किंवा ६ च्या किंवा दोहोंच्या तरतुदींमधून सूट देता येईल. सूट.

**१७.** (१) या अधिनियमाखाली किंवा त्याखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाखाली सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टींबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा कोणतीही कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही. या अधिनियमाखाली केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

(२) या अधिनियमान्वये अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणतेही नुकसान झाल्यास किंवा होण्याचा संभव असल्यास त्याबद्दल [१][राज्य] शासनाविरूद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

१९६० चा ४५. **१८.** या अधिनियमान्वये कोणताही अधिकार वापरण्यासाठी किंवा कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी [१][राज्य] शासनाने प्राधिकृत केलेला किंवा अधिकार दिलेला प्रत्येक अधिकारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ अनुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. अधिकारी लोकसेवक असल्याचे समजणे.

**१९.** (१) [१][राज्य]शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

---

[१] " प्रांत " या शब्दाऐवजी " राज्य " हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल करण्यात आला.

(२) विशेषकरून, आणि वरील अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमांत पुढील तरतुदी करता येतील :—

(एक) कलम ६ च्या पोट-कलम (१) खालील माहिती ज्या नमुन्यात द्यावयाची तो नमुना ;

(दोन) कलम ८ च्या पोट-कलम (१) खाली चौकशी करण्याची रीत आणि पोट-कलम (३) खाली विहित करावयाची नुकसानभरपाईची रक्कम ;

[१][(दोन-क) कलम ९ख अन्वये ज्या रीतीने व ज्या नमुन्यात नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यासाठी किंवा ती देण्यासाठी अर्ज केले पाहिजेत ती रीत व तो नमुना व अर्जासोबत पाठवावयाची माहिती ;]

(तीन) कलम ८ व ९ खालील अपिलांच्या संबंधात आकारावयाची न्यायालय फी ;

(चार) कोणत्याही जमिनीला कलम ५ किंवा ६ च्या किंवा दोहोंच्या तरतुदींपासून सूट देणे आणि ज्या अटींवर व शर्तींवर त्या जमिनीला अशी सूट देण्यात येईल त्या अटी व शर्ती ;

(पाच) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

निरसन. **२०.** (१) मुंबई जमीन अधिग्रहण अध्यादेश, १९४७ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे, आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ व २५ यांच्या तरतुदी या, जणू काही तो अध्यादेश हा अधिनियमच होता अशा रीतीने त्या निरसनाला लागू होतील. सन १९४७ चा मुंबई अध्यादेश क्रमांक ५. सन १९०४ चा मुंबई क्रमांक १.

(२) उक्त अधिनियमाचे निरसन झाले असले आणि या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच्या सात दिवसांच्या कालावधीत त्या अध्यादेशाच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) खाली कळवण्यात आलेली कोणतीही गोष्ट ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीखाली कळविण्यात आली होती असे समजले जाईल ;

(२) कोणत्याही जमिनीचे अधिग्रहण करण्याबाबतचा उक्त अध्यादेशाखालील कोणताही आदेश हा, या अधिनियमाखाली करण्यात आला असल्याचे समजले जाईल ;

(३) उक्त अध्यादेशान्वये अधिग्रहण करण्यात आलेली किंवा अधिग्रहणाधीन असण्याचे चालू ठेवण्यात आलेली कोणतीही जमीन, या अधिनियमाखाली अधिग्रहण करण्यात आली किंवा अधिग्रहणाधीन असल्याचे समजले जाईल.

---

[१] हा खंड, सन १९५५ चा मुंबई अधिनियम ५२ याचे कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

१९५९ चा मुंबई ३३. १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ६३.

[१][२०-क. (१) मुंबई जमीन अधिग्रहण (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५९ च्या प्रारंभानंतर मुंबई राज्याच्या विदर्भ प्रदेशाला लागू असलेला मध्यप्रांत आणि वऱ्हाड निवासस्थान (अधिग्रहण) अधिनियम, १९४८ हा निरसित होईल.

सन १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक ६३ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले तरीदेखील, जे कोणतेही निवासस्थान अशा निरसनाच्या निकटपूर्वी निरसित अधिनियमाखाली अधिग्रहणाच्या अधीन असेल अशा निवासस्थानांचे, त्यानंतर या अधिनियमाखाली अधिग्रहण करण्यात आले असल्याचे समजले जाईल, आणि अशा प्रकारे अधिग्रहण केलेले कोणतेही निवासस्थान, राज्य शासन त्याला इष्ट वाटेल अशा रीतीने कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरू शकेल किंवा त्याचा विनियोग करू शकेल :

परंतु, राज्य शासनास असे कोणतेही अधिग्रहण केलेले निवासस्थान कोणत्याही वेळी अधिग्रहणातून मुक्त करता येईल.

मालमत्तेचे संपादन व अधिग्रहण करण्याबाबतचे इतर कायदे चालू असणे.

**२०ख.** शंका निरसनासाठी, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमाच्या तरतुदी ह्या, मुंबई अधिग्रहण केलेली मालमत्ता (अधिकार चालू ठेवणे) (सौराष्ट्र क्षेत्र) अधिनियम, १९५८ च्या तरतुदींच्या जोडीने असतील व त्यामुळे त्या अधिनियमाच्या तरतुदींचे अल्पीकरण होणार नाही.]

१९५८ चा मुंबई ५६.

अधिग्रहण आदेशांचे विधि-ग्राह्यीकरण.

[२][**२१.** (१) या अधिनियमात किंवा न्यायालयाच्या न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, कलमे ५, ६ किंवा ७ अन्वये २६ जानेवारी, १९५० नंतर आणि मुंबई जमीन अधिग्रहण (सुधारणा) अधिनियम, १९५१ च्या प्रारंभापूर्वी अधिग्रहणाबाबत काढलेल्या कोणत्याही आदेशात असे अधिग्रहण कोणत्या प्रयोजनासाठी करण्यात आले हे विनिर्दिष्ट केलेले नसले तरीही, जर अधिग्रहणाबाबतचा असा आदेश वस्तुतः राज्याच्या किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी काढलेला असेल तर, असा आदेश कधीही विधिग्राह्य असल्याचे किंवा कधीही तसा होता असे समजण्यात येणार नाही किंवा ज्या प्रयोजनासाठी जमिनींचे अधिग्रहण करण्यात आले त्यासंबंधीचे प्रयोजन त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेले नव्हते एवढ्याच केवळ कारणावरून त्या आदेशाबाबत कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही.

१९५१ चा मुंबई ४०.

(२) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे,—

(क) असा कोणताही आदेश, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणास्तव विधिअग्राह्य ठरवणाऱ्या, कोणत्याही न्यायालयाने ३१ ऑगस्ट, १८५१ पूर्वी पारित केलेल्या कोणत्याही न्यायनिर्णयावर, हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर परिणामकारक होणार नाही, किंवा

---

[१] कलम २०क आणि २०ख, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३ याचे कलम ५६ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४० चे कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(ख) राज्य शासनाने किंवा ज्या अधिकाऱ्याने अधिग्रहणाबाबतचा असा आदेश काढला असेल त्याला तो अधिग्रहणाचा आदेश वस्तुतः राज्याच्या प्रयोजनासाठी किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी काढण्यात आला होता याचा पुरावा आपल्यापुढे हजर करण्यास फर्माविण्यास कोणत्याही न्यायालयाला प्रतिबंध होणार नाही.]

घोषित करण्यात आले नाही या कारणास्तव विवक्षित आदेश विधिअग्राह्य न ठरणे.

[1][**२२.** (१) या अधिनियमात किंवा न्यायालयाच्या न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात कोणताही मजकूर असला तरीही, मुंबई जमीन अधिग्रहण (सुधारणा) अधिनियम, १९५५ अंमलात येण्यापूर्वी, कलम ६ खाली केलेला किंवा केलेला आहे असा आशय असलेला आदेश हा, अधिग्रहण केलेली जागा, कलम ६, पोट-कलम (१) खालील अधिसूचनेच्या दिनांकास किंवा दिनांकानंतर रिकामी होती किंवा रिकामी झाली होती अशी स्पष्ट किंवा गर्भित घोषणा अशा आदेशात नव्हती केवळ याच कारणास्तव विधिअग्राह्य आहे किंवा पूर्वी कधीही विधिअग्राह्य होता असे समजता कामा नये किंवा कोणत्याही न्यायालयात उपरोक्त कारणास्तव हरकत घेता कामा नये. १९५५ चा मुंबई १७.

(२) या कलमातील कोणत्याही मजकुरावरून, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणास्तव असा कोणताही आदेश विधिअग्राह्य ठरविणाऱ्या, १३ जानेवारी, १९५५ पूर्वी कोणत्याही सक्षम न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही न्यायनिर्णयास, हुकूमनाम्यास किंवा आदेशास बाध येणार नाही.]

व्यावृत्ती.

[2][**२३.** ज्या कोणत्याही जागेला, स्थावर मालमत्तेचे अधिग्रहण व संपादन अधिनियम, १९५२ लागू होतो असा जागेला या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.] १९५२ चा ३०.

## अनुसूची

१. मुंबई शहर.

२. मुंबई उपनगर जिल्हा.

३. ठाणे जिल्हा.

४. अहमदाबाद जिल्हा.

५. सुरत जिल्हा.

६. नाशिक जिल्हा.

७. पुणे जिल्हा.

८. सोलापूर जिल्हा.

९. अहमदनगर जिल्हा.

[3][१०. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुका]

[4][* * * * * * *]

---

[1] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याचे कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] हे कलम, मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील आदेशाद्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील आदेशाद्वारे नोंद ११ वगळण्यात आली.